# आपला नाकर्तेपणा झाकण्यासाठी पालकमंत्र्यांवर आरोप : आ.दाते



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर शहराची पाणीपुरवठा योजना पालकमंत्र्यांनी अडवली असल्याचा आरोप हा स्वतःचा नाकर्तेपणा झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न असुन पारनेर शहराच्या पाणीपुरवठा योजनेबाबत पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटीलांनी योजना अडवली असल्याचे खोटे आरोप केले जात असून, हा प्रकार म्हणजे स्वतःच्या नाकर्तेपणावर पडदा टाकण्यासाठी केलेला केविलवाणा आणि दिशाभूल करणारा प्रयत्न असल्याचे आ. काशिनाथ दाते यांनी केले. प्रत्यक्षात आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पारनेर शहरासाठी मागिल एक वर्षात १८ कोटी ७१ लक्ष रुपयांचा विकासनिधी उपलब्ध झाला असून, या सर्व कामांना पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांची मोलाची साथ व सहकार्य लाभलेले आहे. विकासकामांना निधी उपलब्ध करून देताना पालकमंत्र्यांनी कधीही दुजाभाव केला नाही, ही वस्तुस्थिती जनतेला माहीत आहे. पारनेर शहराचा विकास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी विशेष मदत केली असल्याचेही आ. दाते यांनी सांगितले.

दुर्दैवाने आमदार दाते यांच्या माध्यमातून शहरासाठी मंजूर झालेली अनेक विकासकामे पारनेर नगरपंचायतमधील सत्ताधारी मंडळींनी राजकीय द्वेषापोटी अडवून ठेवली आहेत. यामुळेच पारनेर शहराच्या विकासाला मोठी खीळ बसलेली असून, त्याची जबाबदारी दुसऱ्यांवर ढकलण्याचा हा केवळ निष्फळ प्रयत्न आहे. आज पारनेर नगरपंचायतमधील सत्ताधाऱ्यांचे नेतृत्व हे आमदारपद भूषवून, तसेच राज्यात सत्तेत असतानाही त्यांनी पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी नेमके कोणते ठोस प्रयत्न केले, हा प्रश्न जनतेला पडलेला आहे. पारनेर शहराला पाणी आणल्याशिवाय पारनेर शहरात पाय ठेवणार नाही आणि मतही मागायला येणार नाही, सत्ता असूनही जर मूलभूत गरज असलेली पाणी योजना पूर्ण करता आली नसेल, तर त्याची जबाबदारी स्वीकारण्याऐवजी इतरांवर आरोप करणे हे राजकीय अपरिपक्वतेचे द्योतक आहे.

**– वसंतराव चेडे, माजी जिल्हा परिषद सदस्य पारनेर**

पारनेर शहराचा विकास हा आमदार दाते यांचा प्रामाणिक ध्यास असून, राजकारणापेक्षा शहराच्या हिताला प्राधान्य देऊन ते सातत्याने काम करत आहेत. विकासकामांना अडथळे आणणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे आणि पारनेरच्या जनतेची दिशाभूल थांबवावी,

**– पै.युवराज पठारे,नगरसेवक**

# रविशंकर विद्यामंदिरमध्ये बाल आनंद बाजार मेळावा



### विद्यार्थ्यांची खास शली 'ताई, मावशी, काकू'ची आरोळी

बाजारात ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विद्यार्थी खऱ्या बाजारातील शैलीने ताई, मावशी, काकू या घ्या! अशा आरोळ्या मारताना दिसले. पालकांनीही या आवाहनांना आनंदाने प्रतिसाद देत वस्तू खरेदी केल्या. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि व्यवहारज्ञान वाढविणारा हा उपक्रम सर्वांच्या कौतुकास पात्र ठरला.

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** विद्यार्थी दशेतच मुलांच्या सर्वांगीण विकासासोबत व्यवहारीक ज्ञान मिळावे, या उद्देशाने कर्जत येथील रविशंकर विद्यामंदिरामध्ये मागील वीस वर्षांपासून 'बाल आनंद बाजार खाऊगल्ली' हा उपक्रम राबविण्यात येतो. यावर्षीचा उपक्रम शनिवारी आयोजित करण्यात आला.

उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष व पत्रकार डॉ. अफरोजखान पठाण यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे प्रमुख कार्यवाहक नंदकुमार लांगोरे, पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश दिवटे, जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष गणेश जेवरे, ऋषी पवार, दिलीप अनारसे, मुख्याध्यापिका सविता बळे आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना व्यवसाय, खरेदी-विक्रीची पद्धत, अर्थकारण, संवादकौशल्य व व्यवहारज्ञान मिळावे यासाठी 'कमवा आणि शिका' या तत्वावर हा उपक्रम वर्षानुवर्षे राबविला जातो. उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी भाजीपाला, मिठाई, पाणीपुरी, भेळ, वडापाव यांसह विविध खाद्यपदार्थांचे तसेच काही उपयुक्त वस्तूंचे आकर्षक स्टॉल लावले होते. विद्यार्थ्यांच्या सर्जनशील मांडणीने संपूर्ण खाऊगल्ली आकर्षक व गजबजलेली दिसत होती.

या बाजारात शिक्षक व पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत खरेदीचा मनमुराद आनंद घेतला.

विशेष म्हणजे, वास्तविक बाजाराप्रमाणे येथेही चहावाला विद्यार्थी सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी काही विद्यार्थी विविध घोषणाबाजी, आवाहन, विनोदी बोलणे अशा क्लृप्त्या वापरताना दिसले. दोन तास चाललेल्या या आनंद बाजारात हजारो रुपयांची उलाढाल झाली.

व्यवहार सोयीसाठी पालकांना सुट्टे पैशांची अडचण येऊ नये म्हणून नंदकुमार लांगोरे यांनी सिद्धिविनायक बँकेच्या माध्यमातून स्वतंत्र स्टॉल उभारला. त्यामुळे आर्थिक व्यवहार अधिक सुरळीत झाले.

# देव मंदिरात नाही,कृतीत दिसला!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** मकर संक्रांत आणि षट्तिला एकादशीचा दिवस. मंदिरात गर्दी, घंटानाद, आरत्या आणि नवसांची रांग. पण श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगावात यंदा भक्तीने एक वेगळाच चेहरा दाखवला. इथे देव केवळ मूर्तीत नाही, तर माणसांच्या हातात, श्रमात आणि सेवाभावात दिसला.



मंदिर आणि ग्रामपंचायत परिसरात काही जागरूक ग्रामस्थांनी कोणताही गाजावाजा न करता स्वयंस्फुर्तीने स्वच्छतेचे श्रमदान केले. ना बॅनर, ना फोटोसेशन. फक्त हातात झाडू आणि मनात जबाबदारी. ही कृती म्हणजे केवळ कचरा उचलणे नव्हते, तर श्रद्धेला सामाजिक भानाची जोड देणारे ठाम विधान होते.देवाच्या चरणी डोकं टेकवण्याआधी आपण ज्या जागेत उभे आहोत, ती स्वच्छ ठेवणंही भक्तीच आहे, हा मूक पण ठसठशीत संदेश या उपक्रमातून दिला गेला. श्रमातून मिळालेलं समाधान हे दर्शनाइतकंच नव्हे, तर त्याहून खोलवर मनाला स्पर्श करून गेलं.षट्तिला एकादशीला तीळदान, उपवास आणि जपाला महत्त्व आहेच. पण आजच्या काळात सेवाभावाचा एक 'तीळ' समाजासाठी अर्पण करणं अधिक अर्थपूर्ण ठरतं. स्वच्छ मंदिर, स्वच्छ गाव आणि स्वच्छ सार्वजनिक परिसर हीच खरी आरती आहे, हे ढवळगावकरांनी दाखवून दिलं. आपण देव मंदिरात शोधतो, की आपल्या कृतीत? फक्त आरत्या आणि मंत्रांनी भक्ती पूर्ण होते का, की समाजासाठी काहीतरी केल्यावरच ती खरी ठरते? स्वच्छ परिसरातच प्रसन्न मन तयार होतं आणि प्रसन्न मनातच ईश्वराचा खरा वास असतो.म्हणूनच दर्शनापुरते न थांबता सेवेला हातभार लावण्याची ही वेळ आहे. भक्ती आणि सेवा यांची सांगड घातली, तरच सणांना सामाजिक अर्थ मिळेल.आणि ढवळगावाने दिलेला हाच संदेश देव दर्शनापलीकडेही भक्ती असते.असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे

# इंदिरा गांधी पॉलिटेक्निक येथे 'गर्जना युथ फेस्टिव्हल २०२६' उत्साहात



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** इंदिरा गांधी पॉलिटेक्निक, बेलवंडी (शुगर) येथे गुरुवार दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी 'गर्जना युथ फेस्टिव्हल २०२६' हा भव्य शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात वार्षिक स्नेहसंमेलन, माजी विद्यार्थी मेळावा तसेच वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी १०.०० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बेलवंडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवळकर तसेच प्रसिद्ध वक्ते कथाकथन विचार तरंग साहित्य मंचचे अध्यक्ष जयवंत आनंद आवटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष शिंदे, दिग्विजय राजेंद्र नागवडे, नागवडे कारखान्याचे सन्माननीय संचालक सावता नाना हिरवे, दत्तात्रय काकडे, बंडू तात्या जगताप, विठ्ठलराव जंगले, भाऊसाहेब बरकडे व प्रवीण लबडे, माजी संचालक सचिन कदम, अशोक काळाने तसेच दिनेश इथापे, मधुकर शेलार, डॉ.अशोक शेलार, रुपेश इथापे, सुभाष पवार, संतोष काळाने, शेषराज काळाने व गोरख लबडे यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाचे आयोजन इंदिरा गांधी पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. प्रशांत भोईटे सर विभाग प्रमुख हवालदार सर, नातू सर, इथापे सर व शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवर्ग तसेच विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

'गर्जना युथ फेस्टिव्हल २०२६'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली असून शैक्षणिक वातावरणासोबतच सांस्कृतिक जडणघडणीसाठी हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# शाश्वत विकासासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक महत्त्वाचे : लामखेडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** गावाच्या शाश्वत विकासासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक महत्त्वाचे असे प्रतिपादन सरपंच प्रियंका लामखेडे यांनी बोलताना व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे,संलग्न जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, मारुतरावजी घुले पाटील कला,वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय,अहिल्यानगर राष्ट्रीय सेवा योजना 'विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर, शाश्वत विकासासाठी युवक: पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापनया योजनेअंतर्गत जिल्हा परिषद शाळा निंबळक, ता.जि.अहिल्यानगर येथे शुक्रवार दि.१६ जानेवारी २०२६ ते २२ जानेवारी २०२६ या सात दिवशीय शिबिराचे उद्घाटन विद्यमान सरपंच निंबळक सौ.प्रियांका अजय लामखेडे, मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला याप्रसंगी त्या म्हणाल्या की,राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दरवर्षी वेगवेगळ्या गावांमध्ये जाऊन सात दिवस नियमित उपक्रम राबवले जातात या उपक्रमांतर्गत स्थानिक गरजा विचारात घेऊन नियोजन केले जाते. तसेच शासकीय योजना ग्रामीण भागातील माहिती करून घेणे हे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात अमुलाग्र परिवर्तन घडवते.



ग्रामीण व शहरी भागाच्या शाश्वत विकासासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक श्रमसंस्कार शिबिरातून घडले जातात.असे उपक्रम राबवले पाहिजे असे मत व्यक्त केले. तसेच याप्रसंगी सात दिवशीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिरप्रसंगी प्राध्यापक स्वयंसेवक विद्यार्थी यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.के.पंदरकर होते. ते म्हणाले की,ग्रामीण,शहरी समाजाच्या बदलत्या गरजांनुसार राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी नवनवीन समस्या वर उपाय शोधून ते निवारण्याचा प्रयत्न केला पाहिजे.या काळातील विशेष उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतःचा कौशल्य विकास करून घ्यावा असे मत यावेळी व्यक्त केले.या शिबिरास माजी जिल्हा परिषद सदस्य अहिल्यानगर माधव लामखेडे,संस्था विश्वस्त डॉ.क्षितिज घुले पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच याप्रसंगी, सोनाली अजित कोतकर (शाळा व्यवस्थापन समिती,निंबळक) उपप्राचार्य प्रा.पी.ए.फटांगरे,कला शाखाप्रमुख प्रा.एस.व्ही.मरकड,आय.क्यु.एस.सी.समन्वयक प्रा.डॉ.एस.बी.दहातोंडे,परीक्षा विभाग प्रमुख डॉ.ए.आर.नेटके, प्रा.ए.के.आहेर, कार्यालय अधीक्षक पी.व्ही.दळवी, कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्यामा वाळके,अल्तमश शेख, ऋतिक ताकपेरे स्वयंसेवक विद्यार्थी प्रतिनिधी शुभम ताजणे,अश्विनी आंधळे, स्वयंसेवक विद्यार्थी यांचे सहकार्य मिळाले.

## द • ख • ल

### उद्या मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, नेत्र, दंत व आरोग्य तपासणी शिबीर

**नगर :** एकदंत गणेश मंदिरतर्फे सोमवार दि. १९ जानेवारी २०२६ रोजी स. १० ते दु.३ या वेळेत दातरंगे मळा,एकदंत कॉलनी, अ.नगर येथे मोफत नेत्र,दंत व आरोग्य तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व औषधे वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले. आज संगणक, टीव्ही व प्रदुषणमुळे डोळ्यांवर व आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागले आहेत. काही शहरी व ग्रामीण भागात डोळ्यांची व आरोग्याची निगा राखण्यामध्ये जनतेचे दुर्लक्ष होत चालले आहे. त्यातच मोतीबिंदू सारख्या सुमारे १५ ते २० हजार रुपयांच्या शस्त्रक्रिया सामान्यांच्या आवाक्याबाहेरच्या असतात. म्हणून हे शिबीर आयोजित केले आहे. एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय,पुणे यांच्या सहकार्याने हे शिबीर होणार आहे. नेत्रतपासणीपासून ते मोतीबिंदू पर्यंतचे सर्व सोपस्कार मोफत करण्यात येणार आहेत. यामध्ये रुग्णांचा नगर ते पुणे प्रवास, भोजन, निवास व काळा चष्मा आदि बाबींचा समावेश आहे.

### पोपटराव पाटील संस्थेच्या संचालकपदी उषा जंगले

**पानेगांव :** नेवासे तालुक्यातील अग्रगण्य सहकारी संस्था म्हणून संबोधली जाणारी कै. पोपटराव पाटील संस्थेच्या संचालकपदी उषा अनिल जंगले यांची बिनविरोध निवड संस्थेच्या सभागृहात संस्थेचे संस्थापक मुळाचे संचालक संजय पाटील जंगले यांचा मागदर्शनाखाली निवडणूक निर्णय अधिकारी नेवासे सहहायक निबंधक कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी धनंजय महाजन, संस्थेचे सचिव ए.पी. बोर्डे यांचा उपस्थितीत पार पडली एका जागेसाठी एकमेव अर्ज आल्याने निवडणूक अधिकारी महाजन यांनी जंगले यांची बिनविरोध निवड जाहिर केली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर जंगले उपाध्यक्ष दादासाहेब काकडे जेष्ठ संचालक बबनराव जंगले, रमेश गुडधे,बाळासाहेब जंगले, नानासाहेब जंगले, अनिल जंगले,अनिकेत जंगले, गणेश जंगले, संजय पवार, गुलाब गायकवाड, बाळासाहेब घोलप, गिताराम जंगले, हितेश जंगले, पानेगांव ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय घोलप, जालिंदर गागरे, शिवाजी जंगले बबनराव जंगले बाबासाहेब शेंडगे आदी उपस्थित होते.

### धनगर समाज सेवा संघाचा आज वधू-वर परिचय मेळावा

**नगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी धनगर समाज सेवा संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने सर्व शाखीय धनगर समाजातील विवाहोत्सुक वधू-वरांचा १० वा परिचय मेळावा तसेच गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ रविवार, दि. १८ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. समाजातील युवक-युवतींच्या विवाह जुळणीसाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गौरवासाठी हा मेळावा उपयुक्त ठरणार आहे,अशी माहिती अध्यक्ष राजेंद्र तागड, निशांत दातीर यांनी दिली.या कार्यक्रमाचे उदघाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे १३ वे वंशज भुषणसिंहराजे होळकर यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. गोपीचंद पडळकर राहणार आहेत.

प्रमुख पाहुणे म्हणून आ. बाबासाहेब देशमुख, माजी खा. सुजय विखे, आ. संग्राम जगताप, सुरेशानंदजी महाराज (शास्त्री) उपस्थित राहणार आहेत.याशिवाय शिवाजीराव बंडगर, विठ्ठलराव वाडगे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी व समाजातील मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

### युतीचा विजय ; निघोजमध्ये जल्लोष

**निघोज :** मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवडसह राज्यातील २९ पैकी २५ महानगरपालिका निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर भाजप-शिवसेना कार्यकर्त्यांनी निघोज येथे जल्लोष साजरा केला. राज्याचे जागृत देवस्थान मळगंगा देवी मंदिरात मिठाई वाटप व फटाक्यांची आतषबाजी करत कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी भाजपचे सांस्कृतिक विभागाचे तालुकाध्यक्ष विलासराव हारदे यांनी देवीची पूजा-अभिषेक केला तर राजूकाका देशपांडे यांनी पौराहित्य केले. जल्लोषात विश्वनाथ कोरडे, सचिन पाटील वराळ, पंकज कारखिले, मनोहर राऊत, विलासराव हारदे यांसह भाजप-शिवसेना कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोनगाव-चनेगाव रस्ता नाही, हा मृत्यूचा सापळा!

## निर्ढावलेल्या प्रशासनामुळे जीवावर बेतले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव :** सोनगाव-चनेगाव हा रस्ता आता प्रवासाचा मार्ग न राहता थेट मृत्यूला आमंत्रण देणारा सापळा बनला आहे. वारंवार इशारे देऊन, बातम्या छापून, निवेदने देऊनही प्रशासनाच्या कानावर जूं सरकलेली नाही. अखेर प्रशासनाच्या ढिम्म, बेफिकीर आणि जबाबदारी झटकणाऱ्या कारभाराचा फटका पुन्हा एका निष्पाप नागरिकाला बसला असून, परिसरात तीव्र संताप उसळला आहे. अपघात हा योगायोग नाही, तर प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा थेट परिणाम आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

प्रवरा सहकारी साखर कारखान्यात कार्यरत असलेले बाळासाहेब अप्पासाहेब दिघे हे आपली ड्युटी संपवून दुचाकीवरून घरी परतत असताना आंब्याचा ओढा परिसरात हा भीषण अपघात घडला. समोरून येणाऱ्या वाहनाच्या प्रखर प्रकाशामुळे क्षणभर दृष्टी दिपली. अतिवृष्टीत अक्षरशः वाहून गेलेल्या रस्त्याचा अंदाज न आल्याने ते थेट सुमारे पंधरा फुट खोल ओढ्यात कोसळले. रस्ता आहे की नाही, याची कोणतीही खूण नाही; कठडे नाहीत, फलक नाहीत, दिवे नाहीतमग अपघात होणार नाहीत तर काय होणार, असा संतप्त सवाल ग्रामस्थ करत आहेत.

अपघाताची माहिती मिळताच यशवंत राधाकृष्ण दिघे यांनी तातडीने गणेश दिघे, कृष्णदीप दिघे, साहेबराव दिघे व केतन दिघे यांना बोलावून मदतकार्य सुरू



केले. शिडीच्या सहाय्याने मोठ्या प्रयत्नाने बाळासाहेब दिघे यांना ओढ्यातून बाहेर काढण्यात आले. या अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाली असून, काही मिनिटे उशीर झाला असता तर आज एक प्राण गेला असता, अशीच चर्चा परिसरात सुरू आहे. हा अपघात प्रशासनासाठी इशारा आहे की, पुन्हा एखाद्या मृत्यूची वाट पाहायची?

सोनगावचनेगाव रस्ता हा केवळ गाव जोडणारा मार्ग नसून, सात्रळ, सोनगाव, धानोरे आणि चनेगाव या चार गावांसह दोन तालुक्यांची जीवनवाहिनी आहे. शेतकरी आपला माल घेऊन, कामगार रोजच्या रोज कारखान्याकडे, विद्यार्थी शिक्षणासाठी आणि दुग्ध व्यवसायासाठी दूध संकलन केंद्रांकडे याच रस्त्यावरून प्रवास करतात. मात्र आज परिस्थिती अशी आहे की, या रस्त्यावरून जाताना वाहनचालक अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. विशेषतः आंब्याचा ओढा परिसर म्हणजे कायमचा धोका बनला असून, पावसाळ्यात येथे अपघातांची मालिकाच सुरू असते.

धक्कादायक बाब म्हणजे, या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत आणि आंब्याचा ओढ्यावरील अपूर्ण कामाबाबत यापूर्वी अनेक वेळा विविध दैनिकांत बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. ग्रामस्थांनी आंदोलने केली, निवेदने दिली, लोकप्रतिनिधींना वारंवार भेटी दिल्या. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित ठेकेदार यांना याचे काहीही सोयरसुतक नाही. प्रशासनाला माणसाच्या जीवाची किंमत शून्य आहे का? असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे.

ग्रामस्थांचा आरोप आहे की, मंजूर टेंडरनुसार काम न करता केवळ कागदोपत्री पूर्तता दाखवली जात आहे. निकृष्ट साहित्य वापरून काम रेंगाळले जात असून, ठेकेदार आणि अधिकारी एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत. परिणामी नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे.

**आज बाळासाहेब दिघे वाचले, पण उद्या कोण? हा प्रश्न संपूर्ण सोनगावधानोरे परिसरात घुमत आहे. प्रशासनाने अद्यापही डोळेझाक सुरू ठेवली, तर भविष्यात घडणाऱ्या प्रत्येक अपघाताची आणि प्रत्येक मृत्यूची जबाबदारी थेट प्रशासनावरच राहील, असा स्पष्ट इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे. आता तरी प्रशासन जागे होणार की, अजून किती बळी गेल्यावर या रस्त्याकडे पाहणारहा प्रश्न जनतेच्या मनात ठसठसत आहे.**

हा केवळ अपघात नसून, प्रशासनाने केलेला गुन्हा असल्याची तीव्र भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

यामुळे ग्रामस्थांनी आता आक्रमक भूमिका घेतली असून, तात्काळ मोजमाप करून रेखांकनानुसार रस्त्याचे काम सुरू करावे, रस्त्याला संरक्षक कठडे, दिशादर्शक फलक आणि प्रकाशव्यवस्था उभारावी, तसेच आंब्याचा ओढा येथे मजबूत आणि सुरक्षित पुलाचे काम तातडीने हाती घ्यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. टेंडरप्रमाणे काम न करणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून त्याच्यावर फौजदारी कारवाई करावी, अशीही मागणी जोर धरू लागली आहे.